संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती

# श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगांव (रेल्वे)

## २०१७-२०१८

## बी.ए.भाग-२

# पर्यावरण क्षेत्रभेट अहवाल
# (गव्हानिपाणी)

सादरकर्ती

कु. काजल लक्ष्मणराव खांडेकर

बी.ए.भाग-२

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ.गणेश टाले

मार्गदर्शक
प्रा.ए.पी.दोड
(भुगोल विभाग प्रमुख)

श्रीराम कला महिला महाविद्यालय, धामणगांव (रेल्वे)

Scanned by CamScanner

# ऋणनिर्देश

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ बि.ए.भाग-२ च्या पर्यावरणशास्त्र या विषयाच्या अभ्यासक्रमात क्षेत्रभेटीचा समावेश केला आहेत. याव्दारे वनपरिसंस्था, गवताळ परिसंस्था, जल परिसंस्था यांचा अभ्यास केला जातो.


श्रीराम कला महिला महाविद्यलया व्दारे पर्यावरण क्षेत्र भेटीसाठी अमरावती जिल्हयाच्या धामणगांव तालुक्यातील गव्हानिपाणी या गवताळ परिसंस्थेची अभ्यास भेटीसाठी निवड करण्यात आली. दिनांक ४ फेब्रुवारी २०१८ रोजी बि.ए.भाग व्दितीयच्या सर्व विद्यार्थीनींनी गव्हानिपाणी परिसरातील टेकडीला व लगतच्या गवताळ प्रदेशाला भेट दिली.

या पर्यावरण क्षेत्रभेटीसाठी श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.अरूणभाऊ अडसड, संस्थेचे सचिव श्री.घनश्यामजी मेश्राम सर, स्थानिय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.अशोकभाऊ पनपालीया यांनी परवानगी दिली याबद्दल आम्ही त्यांचे आभार गरजेचे ठरते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश टाले, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.एन.एम.बिहाडे, प्राए.पी.दोड यांनी यात अभ्यास भेटीचे आयोजन केले. या गवताळ परिसंस्थेच्या ठिकाणी गव्हानिपाणी ग्रामस्थांनी मोलाचे मार्गदर्शन केले. याबद्दल या सर्वांचे आम्ही मनपुर्वक आभार मानले.

**सर्व विद्यार्थीनी**
**बि.ए.भाग-२**
**श्रीराम कला महिला महाविद्यालय**
**धामणगांव (रेल्वे)**

Scanned by CamScanner

# क्षेत्र भेट - गव्हानिपानी
# स्थान नकाशा




Scanned by CamScanner

# गव्हानिपाणी–गवताळ परिसंस्था

आम्ही बि.ए.भाग–२ च्या विद्यापीठ अभ्यासक्रमानुसार गव्हानिपाणी या गवताळ परिसंस्थेस रविवार दि.४ फेब्रुवारी २०१८ रोजी भेट दिली. तेथे पर्यावरणीय दृष्टया परिसंस्थेचा जवळुन अभ्यास केला. त्यातील नोंदी पुढील प्रमाणे आहेत.

**स्थान** –

अक्षयवृत्तीय – २०°, ४५'' उत्तर अक्षवृत्त.

रेखावृत्तीय – ७८°,१३'' पूर्व रेखावृत्त

**महाविद्यालयापासुन अंतर** – महाविद्यालपासुन उत्तरेस १३ कि.मी. वर या टेकडयांचा भुभाग आहे.

**समुद्रसपाटीपासुन उंची** – ९० मी. उंचीवर या टेकडया आढळतात.

**पर्जन्यवृष्टी** –

आम्हाला येथे अनेक प्रकारचे वृक्ष लतावेली दिसल्या. यात चिंच, कडुलिंब, पळस, पिंपळ, वड, आंबा, बाभुळ, साग, जास्वंद, कनेर, गुलमोहर, जांभुळ, उंबर इत्यादि वृक्षांचा समावेश यात होतो. याशिवाय अनेक फुलांची झाडे, काटेरी वृक्ष दिसुन आले.

या परिसरात या विविध वनस्पती पासुन निरनिराळी वनौषधे बनविली जातात. कंदमुळे गोळा केली जातात. काही झाडावरील मधमाश्यांच्या पोळयापासुन सहद गोळा करण्यात येते. येथे सर्वत्र गवताचे आच्छादन दिसते. या गवताचा वापर जनावरांना पाळीव प्राण्यांना चारा म्हणुन केला जातो. तसेच काही घरांच्या छपरासाठी या गवतांच्या पेढयांचा वापर केला जातो. या भागात पळसाचेही भरपुर झाडे आहेत. त्यापासुन पत्रावळी, द्रोण यासारखे गृहपयोगी उत्पादने तयार केली जातात. पळसांच्या फुलांपासुन धुलीवंदनासाठीचा नैसर्गिक रंग तयार करण्यात येतो. ही उत्पादने

Scanned by CamScanner

पर्यावरणदृष्ट्या अतिशय उपयोगी आहे. त्यापासुन मानवी आरोग्याला कुठलीही हानी पोहोचत नाही. परिसरातील कडुनिंब, बाभुळ या झाडावर डिंक निर्मीती करून तो गोळा केला जातो व बाजारात विक्रीस पाठविला जातो.

या परिसरात भरपुर गवत असल्याने त्यावर जगणारे अनेक तृण भक्षक प्राणी येथे आढळतात. या परिसरात हरिण, नीलगाय, रोही, गायी, बैल, म्हशी, बकरी, मेंढरे, ससा आढळतात. काही व्दितीय भक्षकी येथे आढळतात. उदा. कोल्हा, लांडगा, बिबटया, साप, बेडुक इत्यादि हे प्राणी तृणभक्षक प्राण्यांना मारून त्यांचे मास भक्षण करून उदरनिर्वाह करतात. याशिवाय बहुभक्षी असे चिमणी, कावळा, घार, पोपट, सुतार, घुबड, गिधाड, कोकीळा, कबुतर, बगळा, मोर, लांडोर, माळढोक, खंडया इत्यादी आढळतात. तसेच लाखोच्या संख्येने विघटक ज्यात जिवाणू, बुरशी, विषाणु सुक्ष्मजीव सेंद्रीय पदार्थाचे विघटन करतात व पर्यावरणात संतुलन ठेवण्याचे कार्य करीत असतात.

थोडक्यात येथील परिसरात उत्पादक तृणभक्षक, व्दितीय भक्षक, तृतीय भक्षक विघटक मोठया संख्येने आढळतात. यामुळे परिसंस्था निर्माण होते. अन्नसाखळी तयार होते. उर्जेचा प्रवाह निर्माण होतो.

गव्हानिपाणी टेकडी प्रस्तुत पर्यावरण क्षेत्रभेट यासाठी गव्हानिपाणी येथील टेकडीस निवडण्यात आले. या संपूर्ण परिसरात अनेक कमी अधिक उंचीच्या टेकडया आढळतात. या टेकडयांना चिरोडीच्या टेकडया असे म्हणतात. चिरोडीच्या टेकडया या पोहऱ्याच्या डोंगराचाच एक भाग आहे. या टेकडयांची समुद्रसपाटीपासुनची सरासरी उंची ३००-४०० मीटर एवढी आहे. या टेकडया भुगर्भातील अंतर्गत हालचालीमुळे जमिनीचा काही भाग वर उंचावरून तयार झाला आहे. काही शास्त्रज्ञांच्या मते सुमारे

Scanned by CamScanner

७ कोटी वर्षापुर्वी दख्खनच्या पठारावरील ज्वालामुखी उद्रेकाच्यावेळी येथे ज्वालामुखीय विस्फोट होऊन मोठया प्रमाणात लाव्हा इतरत्र पसरला. कालांतराने तो थंड होवून या टेकडयांची निर्मीती झाली. या टेकडीत बेसॉल्ट खडकांचे अवशेषही आढळतात. तसेच परिसरातील जमिन काळी कसदार असुन ती बेसॉल्ट या खडकापासुनच तयार झाली आहे. म्हणुनच या भुप्रदेशाचा समावेश दख्खनच्या पठारात केला जातो. पोहऱ्याचे डोंगर हे देशातील महत्वाचे जलविभाजक क्षेत्र आहे. कारण या डोंगराच्या पुर्वेकडील बाजुस पडणारे पावसाचे पाणी, ओहळ, नाला, उपनदी, नदी, मोठी नदी असे करित बंगालच्या उसागराला जावुन मिळते तसेच पश्चिमेकडील उतारावर पडणारे पावसाचे पाणी अरबी समुद्रास जावुन मिळते.

या ठिकाणी अनेक टेकडया असल्याने पाण्याचे लहान मोठे प्रवाह येथे आढळतात. परंतु उपनदी किंवा नदी येथे आढळत नाही. प्रत्येक टेकडीवरील पावसाचे पाणी लहान ओहळाच्या स्वरूपात उताराच्या ठिकाणी वाहते. येथील जलप्रवाहांच्या वाहण्याची दिशा ही पश्चिम–पुर्व असल्याने हे जलग्रहण क्षेत्र वर्धा नदीचे असुन ते सर्व पाणी शेवटी पुर्ववाहिनी नदीव्दारे बंगालच्या उपसागरात व गोदावरी नदीत विलीन होते.

या पर्यावरण भेटीसाठी आम्ही बि.ए.भाग–२ च्या सर्व विद्यार्थ्यानींनी नियोजन केले. गव्हानिपाणी गावातील नागरीकांच्या भेटी घेतल्या. त्यांना या परिसरातील माहिती विचारली व पर्यावरणीय अवनतीबाबत त्यांना जागृत करून पर्यावरणाचा ऱ्हास कसा थांबविता येईल याविषयी चर्चा केली.

Scanned by CamScanner

# निष्कर्ष

- गव्हानिपाणी परिसरातील टेकडयावर मोठया प्रमाणात वृक्षतोड झालेली दिसुन आली.
- या परिसरातील टेकडयावर वृक्षतोड झाल्याने मोठया प्रमाणात मृदेची धुप झालेली दिसुन येते.
- अती गुरे चराईमुळे या टेकडया पर्णहीन व बोडख्या झाल्या आहेत.
- येथील वृक्षतोडीमुळे अनेक पशुपक्षांचे आश्रय स्थान म्हणजे त्यांची घरटी यांचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे.
- येथे जास्तीत जास्त जमिन लागवडीखाली आणत असल्याने वनाच्छादनाचे प्रमाण घटत आहे.
- गेल्या काही वर्षात रस्ते निर्मीती, रोड रूंदीकरण यामुळे स्थानिक पर्यावरणास हानि पोहचत आहे.
- या परिसरात भुजलाच्या अतिवापर शेतीसाठी करित असल्याने दिवसेंदिवस भुजल पातळी खुप खोल जात आहे.

Scanned by CamScanner

# उपाययोजना

- या टेकडयावर विविध घटकाव्दारे मोठया प्रमाणात वृक्ष लागवड करण्याची आवश्यकता आहे.


- येथील टेकडयावर चर खोदुन मातीचे बांध घालुन पाणी अडविणे आवश्यक आहे. जेणे करून डोंगरावरील हिरवळ वाढेल.

- गुरे चराई नियंत्रीत करून मृदेची धुप कमी करता येईल.

- येथील लहान मोठया जलप्रवाहावर बंधारे निर्माण केल्यास भुजल पातळी उंचावेल व गुराढोरांना पशु-पक्षांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता होईल.

- येथील शेत जमिन उतार पाटी असल्याने शेतकऱ्यांनी उताराला आडवी अशी नांगरणी व पेरणी करावी. जेणे करून पावसाच्या वेळी मृदेची धुप कमी होईल व पावसाचे जास्तीत जास्त पाणी वाहुन न जाता जमिनीत जिरेल.

Scanned by CamScanner



गव्हानिपाणी येथे पर्यावरण क्षेत्रभेट अभ्यासाठी निरीक्षण करतांना महाविद्यालयातील विद्यार्थीनी

Principal
Shriram Kala Mahila
Mahavidyalaya
DHAMANGAON RLY

Scanned by CamScanner